(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय, भाग-६ अ करिता)

क्र. पोमसं/५-अ/स.सा.बदल्या/पोउनि
(भंडार)/१७/२०१७
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,
मुंबई- ४०० ००१.
दिनांक :-१० /०४/२०१७.

वाचा :- १) महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१
२) आस्थापना मंडळ क्र. २ यांचे दि. १०/०४/२०१७ च्या बैठकीचे इतिवृत्त

## आदेश

महाराष्ट्र पोलीस कायदा कलम २२ न (२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांनी प्रशासकीय कारणास्तव जनहितार्थ विशेष बाब म्हणून पोलीस उपनिरीक्षक (भंडार.) यांनी केलेल्या विनंतीचा सांगोपांग विचार करुन खालीलप्रमाणे पदस्थापनेचा निर्णय घेतला आहे.

| अ.क्र. | पोलीस उपनिरीक्षका (भंडार) यांचे नांव | सध्याचे नेमणुकीचे ठिकाण | बदलीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | वाघचौरे विनायक मधुकर | संचालक कार्यालय, पुणे | मुंबई शहर |

२. संबंधीत घटक प्रमुखांनी या आदेशांची प्रत, आणि बदली ठिकाणी **कार्यमुक्त करण्यात आलेल्या आदेशांची प्रत, उक्त पोलीस उपनिरीक्षकांना** (भंडार) **व्यक्तिशः अदा करुन,** त्या आदेशांच्या दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेवून, त्या पोंच या कार्यालयास सत्वर सादर कराव्यात.

३. संबंधीत घटक प्रमुखांनी **उपरोक्त बदली आदेशाधिन असलेल्या उक्त पोलीस उपनिरीक्षक** ( भंडार ) **यांना बदलीवर सोडताना पर्यायी/ बदलीवर येणा-या पोलीस उपनिरीक्षकांची वाट न पाहता, बदलीवरील नेमणुकीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे.** तसेच, सदर पोलीस उपनिरीक्षकांना बदलीवर कार्यमुक्त केल्याचा दिनांक संबंधीत घटक प्रमुखांनी, **या कार्यालयास दिनांक ३०/०४/२०१७ पुर्वी (कार्यासन क्रमांक ५-अ यांना लक्षवेध करुन)** निश्चितपणे कळवावा.

४. उपरोक्त आदेशान्वये पोलीस उपनिरीक्षक (भंडार) यांची बदली ज्या घटक कार्यालयात दर्शविण्यात आली आहे, तेथे सदर पोलीस उपनिरीक्षक हजर होण्याची जबाबदारी बदलून गेलेल्या ठिकाणच्या पोलीस घटक कार्यालयाची

राहील, याची नोंद घ्यावी. त्यासाठी त्यांनी पाठपुरावा करावा. विहित वेळेत हजर न होणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

५. संबंधीत घटक प्रमुखांनी, **त्यांच्या घटकात बदलून येणारे जे पोलीस उपनिरीक्षक** (भंडार) **या आदेशांनुसार बदलीवर नेमणुकीच्या ठिकाणी हजर होणार नाहीत, त्यांची नावे** कृपया या कार्यालयास **कार्यासन क्रमांक ५-अ यांना लक्षवेध करुन** फॅक्सद्वारे व **desk५a.dgoffice@mahapolice.gov.in** या ई-मेल वर कळवावीत. तसेच, **त्यांच्या घटकातून बदलून जाणारे जे पोलीस उपनिरीक्षक बदलीवर हजर होण्याचे टाळून रुग्णनिवेदन करतील, अशा पोलीस उपनिरीक्षकांनाही त्यांनी रुग्णनिवेदन केलेल्या दिनांकापासून बदलीवर कार्यमुक्त केल्याचे (deemed relieved) दर्शविण्यात यावे,** आणि त्याबाबतचा स्वतंत्र अहवालदेखील या कार्यालयास **कार्यासन क्रमांक ५-अ यांना लक्षवेध करुन** फॅक्सद्वारे व **desk5a.dgoffice@mahapolice.gov.in** या ई-मेल वर सत्वर सादर करावा. तसेच, संबंधीत घटक प्रमुखांनी **अशा संबंधीत पोलीस उपनिरीक्षकांविरुध्द या कार्यालयाचे पत्र क्र. २/५५/०७, दि. १६/०९/१९८३, दि. ११/०१/१९८४, व दि. १०/०२/१९९१, तसेच परिपत्रक क्र.पोमसं/३/५५०७/६/९, दि. १३/०२/१९९७ मधील सूचनांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी, व तसाही अनुपालन अहवाल या कार्यालयास कार्यासन क्रमांक ५-अ यांना लक्षवेध करुन सत्वर सादर करावा.**

६. बदलीच्या आदेशांची अंमलबजावणी करण्याबाबत सर्व संबधीत घटक प्रमुखांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

७. सदर आदेश http://www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर **FLASH** या शिर्षाखाली देखील उपलब्ध आहेत.

**(राजकुमार व्हटकर)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**प्रति,**
अपर पोलीस महासंचालक, बिनतारी संदेश विभाग, म.रा., पुणे

**प्रत सविनय सादर :-**

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृहविभाग,
दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२

**प्रत सादर,**
अपर पोलीस महासंचालक, बिनतारी संदेश विभाग, म.रा., पुणे

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-**

महालेखापाल-१, मुंबई व महालेखापाल-२, नागपूर. (सस्नेह)

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

कोषाधिकारी, पुणे

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई (सदर आदेश संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी)

प्रत :-

कार्यासन अधिकारी, का.क्र. ३-अ, ९, ११, ११-अ, १४, १६, २८, ३६ व ४०.